Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माध्य/उमा.परीक्षा/3431
कोल्हापूर-०४
दि. ०१ /०९/२०२५
१०

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/क.महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क्र. १७) होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.**

**संदर्भ :- १.या कार्यालयाचे क्र.कोविमं/१२ वी परीक्षा/३२६१ दि. १५/०९/२०२५ रोजीचे पत्र**
**२. क्र.रा.मं/परीक्षा-३/३०१६ दि.२९/०९/२०२५ रोजीचे पत्र**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने नियमित शुल्कासह स्विकारण्यासाठी दि. १६/०९/२०२५ ते दि. ३०/०९/२०२५ पर्यंतची मुततवाढ देण्यात आली होती. जे विद्यार्थी सदर मुदतीत नावनोंदणी करू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांना खालीलप्रमाणे पुनःश्च मुदतवाढ देण्यात येत आहे.

| तपशील | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा (मुदतवाढ) |
|---|---|
| **विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे.** | **बुधवार दि.०१/१०/२०२५ ते बुधवार दि.१५/१०/२०२५** |

१. इ. १०वी व इ. १२वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यक्षेतील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १०वी व इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाइन (online) पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाइन (offline) अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळाचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी. या संदर्भात अधिक माहितीसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

४. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १)शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नमल्यास द्वितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २)आधारकार्ड ३)स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

५. **पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) ऑनलाईन देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. तसेच पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Form) मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांनी छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून परत घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी.**

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 01-10-2025 17:43:50

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर